# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १५-०२-२०१८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

गुरूवार दिनांक १५ फेब्रुवारी २०१८ रोजी (का.प.क्र.०७) मा.महापौर श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११.०० वा.वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.डी.एम.मुगळीकर,भाप्रसे, नगर सचिव श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| २. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ३. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ४. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| ५. | स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी |
| ६. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ७. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ८. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| ९. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| १०. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| ११. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १२. | स.स.श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले |
| १३. | स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान |
| १४. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १५. | स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय |
| १६. | स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| १७. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| १८. | स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद |
| १९. | स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ |
| २०. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| २१. | स.स. श्री.सय्यद मतीन रशीद |
| २२. | स.स. श्रीमती परवीन खैसर खान |
| २३. | स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ |
| २४. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| २५. | स.स. श्रीमती सय्यद सरवत बेगम आरेफ हुसैनी |
| २६. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| २७. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |

| | |
|---|---|
| २८. | स.स. श्री.खान जहांगीर मुलानी |
| २९. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |
| ३०. | स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे |
| ३१. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| ३२. | स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र |
| ३३. | स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी |
| ३४. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| ३५. | स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव |
| ३६. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |
| ३७. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| ३८. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| ३९. | स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ |
| ४०. | स.स. श्री.अजीम अहेमद रफीक |
| ४१. | स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी |
| ४२. | स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी |
| ४३. | स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया |
| ४४. | स.स. श्री.तनवाणी राजु लेखराज |
| ४५. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ४६. | स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ |
| ४७. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ४८. | स.स. श्री.एडके विकास प्रकाश |
| ४९. | स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय |
| ५०. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| ५१. | स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम |
| ५२. | स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी |
| ५३. | स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास |
| ५४. | स.स. श्री.शेख जफर अखतर |
| ५५. | स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ५६. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ५७. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ५८. | स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत |
| ५९. | स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश |
| ६०. | स.स. श्रीमती जोहरा बी नासेर खान |
| ६१. | स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत |
| ६२. | स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण |
| ६३. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |

| | |
|---|---|
| ६४. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ६५. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ६६. | स.स. श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे |
| ६७. | स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र |
| ६८. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ६९. | स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास |
| ७०. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |
| ७१. | स.स. श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे |
| ७२. | स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव |
| ७३. | स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र |
| ७४. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ७५. | स.स. श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे |
| ७६. | स.स. श्री.सोहेल शकील शेख |
| ७७. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ७८. | स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| ७९. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ८०. | स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव |
| ८१. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ८२. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ८३. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ८४. | स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| ८५. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ८६. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ८७. | स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट |
| ८८. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ८९. | स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे |
| ९०. | स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन |
| ९१. | स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे |
| ९२. | स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे |
| ९३. | स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी |
| ९४. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ९५. | स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण |
| ९६. | स.स. कु.जमादार सायली भागवत |

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
३. श्री.कांबळे चेतन जनार्धन

श्री.विकास जैन :कोरम नाही. सभा काही वेळासाठी तहकूब करावी.

मा.महापौर :कोरम नसल्याने सभा अर्धा तासासाठी तहकूब करण्यात येते.

(वेळ ११-०५ वा पुन्हा सभा ११-४० वाजेला सुरूवात.)

श्री.राजेंद्र जंजाळ :जेष्ठ साहित्यिक श्री.राणा गुरूजी यांचे नुकतेच निधन झाले. श्रध्दांजली अर्पण करावी.

(यास श्री.त्र्यंबक तुपे,श्री.भगवान घडमोडे,श्रीमती किर्ती शिंदे, श्रीमती अर्चना निळकंठ यांनी अनुमोदन दिले.)

मा.महापौर :ठिक आहे. स्व.राणा गुरूजी यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी सर्वांनी उभे रहावे.

या वेळी स्व.राणा गुरूजी यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

श्रीमती माधुरी देशमुख :या शहरातील खेळाडुंना राज्य शासनाने शिवछत्रपती पुरस्कार जाहीर केला. त्यांचा अभिनंदनाचा ठराव मंजूर करावा. त्यांना पत्र देऊन त्यांचा येथे सन्मान करावा.

श्री.रेणकादास वैद्य :रिध्दी-सिध्दी हत्तेकर हिने जिम्नेस्टीक मध्ये या शहराचे, राज्याचे व राष्ट्राचे नाव उंचाविले त्याचेही अभिनंदन करावे.

श्री.राजगौरव वानखेडे :या शहरातील १६ खेळाडूंना शिवछत्रपती पुरस्कार मिळालेला आहे. या शहराचे नाव उंचाविले आहे. त्या सर्वाचे अभिनंदन करावे व या सभागृहात त्यांचा सत्कार करावा.

श्री.त्र्यंबक तुपे :या खेळाडूंना प्रोत्साहन मिळण्यासाठी या खेळाडूंचा महापालिकेने सत्कार करावा. भविष्यात जे खेळाडू तयार होतील, काहीची आर्थीक परीस्थिती बरोबर नसते. त्यांना प्रोत्साहन देणेसाठी महापालिका त्यांचे पाठीशी आहे. अपंग खेळाडू साठी वेगळा निधी असायला पाहिजे. तसा शासन जीआर आहे. अशा खेळाडूंना हक्काचा निधी मिळावा त्यासाठी तरतूद करावी व ज्यांना शासनाचा पुरस्कार मिळाला. त्यांचा अभिनंदनाचा ठराव पारीत करावा.

श्री.भगवान घडमोडे :खेळाडूंचा सत्कार करावा. जे अपंग खेळाडू आहे त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यासाठी काय करता येईल? निर्णय घ्यावा.

श्री.शिवाजी दांडगे :४ ते ८ फेब्रुवारी दरम्यान दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय खा-खो स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त केलेली कु.मयुरी पवार व कु.ज्योती पुकाटे यांचा महापालिकेतर्फे सन्मान पत्र देऊन सत्कार करावा.

श्री.जगताप भाऊसाहेब :आताच सुचना केल्यानुसार त्या १६ खेळाडूंचा सत्कार करावा. अपंगासाठी ३ टक्के निधीची तरतूद करावी.

श्री.अब्दुल नाईकवाडी :खेळाडुंबाबत जी सुचना केली त्यास अनुमोदन आहे.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:बुध्दीबळ स्पर्धेत कु.साक्षी चितलांगे व तिचे वडील दिनेश चितलांगे यांना पुरस्कार मिळाला. त्यांचा सत्कार करावा.

श्रीमती सिमा खरात :शिवछत्रपती पुरस्कार मध्ये श्री.संजयजी मोरे यांचे नाव आहे. त्यांचाही सत्कार करावा.

मा.महापौर :नुकताच राज्य शासनाच्या वतीने अनेक खेळाडूंना शिवछत्रपती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यात या शहरातील काही खेळाडू आहेत त्या सर्व

खेळाडूंचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करण्यात येते. स.सदस्य श्री.तुपे यांनी सुचना मांडली की, काही खेळाडूंसाठी शासनाचे परीपत्रक आहे की, वेगळा निधी असतो. खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे. काहींची आर्थीक परीस्थिती बरोबर नसते म्हणून पुढे जाता येत नाही. त्यांचा जो हक्काचा निधी आहे. त्यासाठी संबंधीत विभागाकडून तसा एक प्रस्ताव घेऊन योग्य ती कार्यवाही होईल. या सर्व खेळाडूंचा मनपा तर्फे सत्कार करण्यात येईल. त्या बाबतीत सर्व पदाधिकारी प्रशासन यांचेशी चर्चा करून तारीख निश्चित करावी.

श्री.राजगौरव वानखेडे :मनपाचे अधिकारी श्री.खरवडकर यांनी २-३ दिवसापूर्वी फेसबुकवर सभागृहातील सदस्यांची लायकी वजा मजकूर टाकला. अनेक सदस्य या सभागृहात २०-२५ वर्षापासून कार्यरत आहेत. जर एखाद्या विकास कामासाठी किंवा अधिकारी यांचे संबंधी सभागृहात चर्चा होते. त्यानंतर एक अधिकारी यांनी स्वत:चे मत न मांडता सोशल मिडीयावर महापालिकेची बदनामी केली. सर्व सदस्य नालायक आहे. असे म्हटले. यापुर्वी सदस्यांकडून अधिकारी यांचे विषयी अपशब्द निघाले तर सर्व अधिकारी व आयुक्त सभागृह सोडून गेले होते. संबंधीत अधिकारी यांचेवर निलंबनाची कार्यवाही करावी. आज त्यांनी खुलासा केला की, मी लोकसभेच्या सभागृहा विषयी बोललो. परंतु लोकसभेच्या सभागृहा विषयी बोलण्याचा अधिकार त्यांना नाही.

श्रीमती सायरा बानो :फाजलपूरा भागात एका मुलाचा मोकाट कुत्र्याच्या तावडीतून बचाव करण्यासाठी व स्वत:ला कुत्र्याने चावा घेऊ नये. यासाठी श्री.फेरोज खान नावाचे व्यक्तीने चार मजली इमारतीवर चढून कुत्र्याला हाकलण्याचा प्रयत्नात ते इमारतीवरून खाली पडले व त्यातच त्यांचा मृत्यू झाला ते कुटूंबातील कर्ते पुरूष होते. त्यांचे कमाईवर कुटूंबातील पाच व्यक्तीचा उदरनिर्वाह भागत होता. या व्यक्तीच्या कुटूंबीयांना मानवतेच्या दृष्टीकोनातून किमान ५ लक्षची आर्थीक मदत करावी.

मा.महापौर :संबंधीतास आर्थीक मदत देणेसाठी तसा प्रस्ताव स.सदस्यांनी दिलेला आहे. माणुसकीच्या नात्याने यावर प्रशासनाने सहानुभूतीपुर्वक विचार करून आवश्यक ती मदत करावी.

श्री.त्र्यंबक तुपे :मागिल बैठकीत अधिकारी यांचे कामकाजा विषयी सभागृहात चर्चा झाली. त्यानुसार श्री.जयंत खरवडकर यांनी फेसबुकवर सभागृहाच्या विषयी एक पोस्ट टाकली. ११५ सदस्याच्या विषयी त्याची वेगळी भावना धारणा असावी. जी मागणी आम्ही करतो तो वैयक्तिक कुणावरही आरोप नाही. विकास कामाबद्दल व अधिकारी चुकीने काम करीत असेल त्यावर आम्ही बोलत असतांना आपण सर्व नालायक ठरतो का? यापुर्वी अधिकारी यांचे बाबतीत सदस्याकडून बोलले गेले होते तेंव्हा अधिकारी सभागृहा बाहेर निघून केले. यापूर्वी दोन अधिकारी यांनी सभागृहाच्या बाबतीत अपशब्द वापरले त्यांचेवर कार्यवाही केली होती. अधिकारी यांनी चुक व प्रशासनाची फसवणूक करायची जे वकील पॅनलवर नव्हते. तरी त्यांना न्यायालयात उभे केले. प्रशासनाची फसवणूक नाही का? विचारले तर खासदार श्रीमती चौधरी व मा.पंतप्रधान मोदी साहेब यांचे विषयी

बोललो असे सांगण्यात आले. श्री.खरवडकर यांचा रेकॉर्ड काढला तर वर्षातून किती दिवस ते कार्यालयात असतात. सर्वांना माहित आहे. जर अधिकारी चुकीची कामे करीत असेल तर कार्यवाही व्हावी. सदस्यांना वेडेवाकडे बोलणे. अपशब्द वापरणे हे चुकीचे आहे. पॅनल वर वकील नसतांना मा.कोर्टात उभे केले. त्यांनी मा.कोर्टाचा,प्रशासनाचा व सभागृहाचा अवमान केलेला आहे.त्यामूळे या अधिकाऱ्यावर निलंबनाची कार्यवाही करावी. तसेच फसवणूक केल्या प्रकरणी त्यांचेवर पोलीस गुन्हा दाखल करावा.

श्री.गंगाधर ढगे :एक अतिक्रमण काढले म्हणून श्री.खरवडकर यांना टारगेट करण्यात येत आहे. त्यांनी जी पोस्ट टाकली ती काही लोकांचे नाव घेऊन टाकली नाही. त्यांनी काही लोकांना उद्देशुन केलेले आहे. ११५ सदस्यांचा त्यात उल्लेख नाही. एखादा अधिकारी नियमानुसार काम करीत असेल तर व त्यांना टारगेट करीत असेल योग्य नाही. जे सत्य असेल ते सत्य झाले पाहिजे.

या वेळी सदस्य मोठमोठ्याने घोषणा देत असतात.

श्री.सोहेल शकील :अधिकारी काम करीत असेल तर कोणतीही पोस्ट फेसबुकवर टाकू शकतात का? त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.अफसर खान :सदस्यांना काही येत नाही असे म्हणून त्यांनी पोस्ट टाकली. ११५ सदस्यांची बदनामी केली. हे सदस्य सर्व नालायक आहेत का? मा.श्रीमती चौधरी ह्या खासदार आहेत. २०-२५ वर्षापासून त्या निवडून येत आहे. त्याचे व वरीष्ठ नेत्याच्या बाबतीत श्री.खरवडकर यांना बोलण्याचा अधिकार नाही. या सभागृहाला त्यांना बोलण्याचा अधिकार नाही. श्री.खरवडकर हे चांगले काम करतात की नाही. त्या बाबतीत सभागृहाला बोलण्याचा अधिकार आहे. श्री.खरवडकर हे महापालिकेचे नोकर आहे पगार घेतात. त्यांनी जी प्रशासनाची फसवणूक केली. त्यांचेवर गुन्हा दाखल करावा व त्यानंतर त्यांना निलंबीत करावे.

श्री.भाऊसाहेब जगताप :मागिल बैठकीत श्री.जयंत खरवडकर यांनी मनपाची कशी फसवणूक केली त्यावर चर्चा झाली होती. त्यामूळे त्यांनी फेसबुकवर पोस्ट टाकून या ११५ सदस्यांचा, १५ लक्ष लोकांचा अपमान केला आहे. अधिकारी यांना अशी भाषा वापरण्यास शोभते का? त्यांनी नंतर पलटवार केला की, लोकसभेत असलेल्या खासदार श्रीमती रेणुका चौधरी यांचे बाबतीत पोस्ट टाकली. अशा अधिकाऱ्यावर निलंबनाची कार्यवाही करावी. त्यांचेवर गुन्हा दाखल करावा.

श्री.अय्युब जहागीरदार :जर जाणूनबूजून त्यांची चूक केली. सभागृहाचा अवमान केला असेल तर आपण जो निर्णय देणार असेल तो द्यावा. दमडी महल येथील अतिक्रमणाच्या संदर्भात त्यांना टारगेट तर केले जात नाही ना? हे सदस्य निदर्शनास आणून देत होते. प्रशासकीय कामात अडथळा निर्माण केला म्हणून आमच्या पक्षाचे पाच सदस्यांना निलंबीत केले तर एका सदस्यांनी उपआयुक्त यांची कॉलर धरली. त्यांनी लेखी तक्रार केली, तरी त्या सदस्यांवर कार्यवाही करणार की नाही?

श्री.राजेंद्र जंजाळ :श्री.खरवडकर यांनी पोस्ट सोशल मिडीयावर टाकली. त्या बाबत असे म्हणावे लागेल की, आपण व उपमहापौर व जे जे पदाधिकारी जे सदस्य आहे त्यांचा

अपमान त्यांनी केला. श्री.खरवडकर यांचे बाबतीत अनेकदा या सभागृहात चर्चा झाली. या पुर्वी सुध्दा त्यांचेवर कार्यवाही केली निलंबीत केले होते. दमडी महल येथील घर पाडले म्हणून टारगेट केले जाते. असा विषय नाही. यापूर्वी मी काही कागदपत्र आयुक्ताकडे, आपणाकडे सादर केले त्याचा खुलासा करावा. श्री.खरवडकर यांना आदेश देऊनही ते सभागृहात आले नाही. त्यांनी फेसबुकवर कोणत्या पक्षाची बाजू मांडली कुणी त्यांना अधिकार दिले केंद्रात त्यांना स्वीकृत खासदार तर केले नाही ना? ते सभागृहात का आले नाही?

मा.महापौर :त्यांनी मला फोन केला की, माझी तब्येत ठिक नसल्याने मी येऊ शकत नाही.

उपआयुक्त-म :स.श्री.राजेंद्र जंजाळ यांनी माहिती विचारली होती, ती माहिती दिलेली आहे. श्री.जयंत खरवडकर यांचे पदस्थापने बाबत मा.सर्वोच्च न्यायालयाच्या प्रकरणाची छायाप्रत दिली आहे. मा.उच्च न्यायालयाच्या समोर अॅड.विजय शर्मा यांनी प्रतिवादी १,२ महापालिकेतर्फे बाजू मांडल्याचे दिसून येते. संबंधीत वकीलांना २००७ च्या आदेशानुसार वकील पॅनलवरून कमी केल्याचे दिसून येते.

श्री राजेंद्र जंजाळ :मुळात पॅनल वर महापालिकेचे वकील नाही. त्यांनी महापालिकेची बाजू मांडली की, श्री.खरवडकर यांना नगर रचना विभागाच्या पदावर बसण्यासाठी महापालिकेची काही हरकत नाही. ज्याचा महापालिकेशी संबंधच नाही महापालिकेचे काय म्हणणे आहे ते तिथपर्यत पोहचले नाही. त्यामूळे श्री.खरवडकर यांचे बाजूने मा.उच्च न्यायालयाचे ऑर्डर केलेली आहे. यात मनपाची फसवणूक झाली नाही का?

मा.महापौर :या प्रकरणात मा.आयुक्तांशी चर्चा झाली. ते चौकशी करीत आहेत. महापालिकेच्या पॅनलवर नसतांना त्या वकीलानी बाजू मांडली. त्या बाबत विधी विभागाकडून कार्यवाही चालू आहे. पॅनलवरच नाही तर कुणाच्या सांगण्यावरून बाजू त्या वकीलाने मांडली त्याची चौकशी चालू आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :चौकशी करणे चालूच असते. तीन वर्षापासून अनेक चौकशा चालू आहे. त्याचा अहवाल आला नाही. ६-६ महिने चौकशी होत नाही म्हणून त्या अधिकाऱ्यांना रूजू करून घेतले. या बाबतीत सुध्दा तसेच होणार. प्रशासनाला चौकशी करण्यास किती वेळ लागणार आहे. जो वकील बाजू मांडत होते ते पॅनलवर नव्हते. हे विधी विभाग सांगत असेल तर आणखी कोणती चौकशी करणार आहे? आता वेळ कार्यवाही करण्याची आहे. चौकशीच्या नावाखाली आमच्या प्रश्नाला बगल मिळणार नाही. याची दखल घ्यावी.

मा.महापौर :कुणाच्या सांगण्यावरून त्या वकीलाने बाजू मांडली. त्यांचेवरही चौकशी करून कार्यवाही करावी लागेल.

श्री.राजेंद्र जंजाळ :वकीलावर, श्री.खरवडकर यांचेवर कार्यवाही व्हावी. चौकशी किती दिवस व किती वेळ केली जावी? यास मर्यादा आहे. श्री.खरवडकर यांचे बाजूने मा.उच्च न्यायालयात निर्णय झाला. त्यास मा.सुप्रीम कोर्टाने स्टे दिला. मा.आयुक्तांचे असे म्हणणे होते की, तो स्टे एका तारखेत खारीस झाला. तो खुलासा करावा. श्री.खरवडकर यांचे महापालिकेत कोणत्या पदासाठी मा.सुप्रीम कोर्टात प्रकरण चालू आहे.

उपआयुक्त-म :श्री.खरवडकर यांना नगर रचनाकार पदावरून शाखा अभियंता या मुळ पदावर सन-२००२ मध्ये पदान्नावत करण्यात आले. या बाबत श्री.खरवडकर यांनी मा.उच्च न्यायलायात याचिका क्रमांक १०८२/२००३ द्वारे आवाहन दिले. या दरम्यान मा.न्यायालयात दाखल केलेल्या याचिका क्र.२५९४/९५ ४-६-२००३ अन्वये श्री.खरवडकर यांना सहा.नगर रचनाकार हे पद रिक्त असल्यास त्या पदावर पदस्थापना देणे. बाबतचे स्वातत्र्य परत मनपास देण्यात आले आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :सहा.नगर रचनाकार हे पद आस्थापनेवर मंजूर आहे का?

उपआयुक्त-म :सन-१९८३ पासून महापालिकेत सहा.नगर रचनाकार या पदावर शासनाकडून प्रतिनियुक्तीवर अधिकारी येत होते. त्यानंतर वेळोवेळी शासकीय अधिकारीच आलेले आहे. त्यानंतर शासनाने अधिकारी देणे बंद केले म्हणून टीडी राजपूत यांना सहा.नगर रचनाकार म्हणून तात्पुरती पदोन्नती देण्यात आली.

श्री.राजगौरव वानखेडे :सन-१९९२ पासून शासनाचे अधिकारी येणे बंद झाले. आस्थापनेवर हे पद भरायचे असेल तर शासनाची मंजूरी आवश्यक आहे. ती मंजूरी घेतली का? पद मंजूर नसतांना सुध्दा त्यांना त्या पदावर कसे दिले? यापुर्वी चार क.अभियंता होते त्यांना हे पद का दिले नव्हते. सभेपुढे मंजूरीसाठी का आले नाही?

श्री.राजेंद्र जंजाळ :माहिती देतांना योग्य पुराव्यासह असावी. खोटी माहिती देऊ नये. कुणालाही त्या पदावर नेमता येते का? त्यासाठी नियम असतात.

उपआयुक्त-म :या पदावर शासनाचे अधिकारी येत होते यापुर्वी या पदावर श्री.राजपूत यांना पदोन्नती दिली होती. २०१० च्या सेवाभरती नियमामध्ये या पदाची तरतूद असल्यामूळे श्री.खरवडकर यांना निवड समितीने सहा.नगर रचनाकार या पदावर कायम स्वरूपी पदस्थापना दिली आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :सेवा भरती नियम हा विषय वेगळा होतो. जर पद मंजूर नाही. तर यांना हे पद देणेसाठीच सेवाभरती नियमानुसार दिले गेले. दुसऱ्या पदाच्या बाबतीत सेवाभरती नियमाचाच विचार का होत नाही?

श्री.राजेंद्र जंजाळ :मुळात हे पद मंजूर नाही. मा.आयुक्तांनी म्हटले की, मा.सुप्रीम कोटाचा मा.उच्च न्यायालयाच्या आदेशावर स्टे नाही. लेटेस्ट ऑर्डर आहे की, त्याचे पदाच्या बाबतीत मा.सर्वोच्च न्यायालयाचा स्टे आहे. या बाबत प्रशासनाचे काय म्हणणे आहे?

श्री.राजगौरव वानखेडे :मा.सुप्रीम कोर्टात नगर रचनाकार या पदासंबंधी प्रकरण आहे. ते सध्या सहा.नगर रचनाकार म्हणून काम करीत आहे. त्यांची बदली करणे योग्य आहे. मा.कोर्टाचा यात अवमान होत नाही. क.अभियंता पदावरून या पदावर नियुक्ती देणे म्हणजे नवीन नियुक्ती आहे. म्हणून उमादेवी विरूध्द कर्नाटक शासनाच्या बाबतीत मा.न्यायालयाने जे आदेश दिले त्याचा भंग होतो आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :उमादेवी विरूध्द कर्नाटक सरकार च्या प्रकरणाच्या बाबतीत निर्णय झाल्यानंतर या मनपात ७० लोक भरती केले. ०२ कर्मचारी घ्यायचे तर नियम दाखवित आहे. मा.सुप्रीम कोर्टात आजची त्या प्रकरणाची परीस्थिती काय आहे?

श्री.राजगौरव वानखडे :प्रशासन त्यांचे सोयीनुसार शासन जीआरची अंमलबजावणी करते. यापुर्वी या विषयावर चर्चा झाली. त्यांनी सभागृहाला नालायक म्हटले आहे. त्यांचेवर कार्यवाही करावी.

उपआयुक्त-म :मा.सुप्रीम कोर्टात महापालिकेने पीटीशन दाखल केले आहे. दि.३०-६-२०१६ चे स्टेटस आहे. (सभागृहात वाचून दाखवितात.)

श्री.राजेंद्र जंजाळ :मा.न्यायालयाचा जो स्टे होता. तो व्हॅकेट झालेला नाही. त्यांचे भांडण नगर रचनाकार या पदासाठी चालू असून त्यांना सहा.नगर रचनाकार या पदाचा अतिरिक्त चार्ज दिला. हे अधिकारी सुट्टीवर गेले होते ते आल्यानंतर आयुक्त श्री.बकोरीया यांनी त्याची बदली अतिक्रमण विभागात केली होती. त्यानंतर त्याची सहा.नगर रचनाकार पदाची ऑर्डर केंव्हा काढली.

उपआयुक्त-म :दिनांक १३ एप्रिल २०१७ ला त्याची मुळ पदस्थापना अतिक्रमण विभागात व सहा.नगर रचनाकार या पदाचा अतिरिक्त चार्ज दिला होता. त्यानी पत्र दिले की मी तांत्रिक संवर्गाचा अधिकारी आहे. मला अतांत्रिक पदावर देणे योग्य नाही. त्यावर ते पदनिर्देशित अधिकारी पदावर रूजू न होता नगर रचना विभागात काम करीत आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :या अधिकाऱ्याची सुरूवातच खोट्यापासून झाली व नालायक व्यक्तीच खोटे बोलतात. असे माझे मत आहे. प्रशासनाने त्याची बाजू घेण्याचा प्रयत्न केला. प्रशासनाला आम्ही त्यांचे विषयी कागदपत्र दिली. सभागृहातील चर्चा त्यांचे पर्यत जात आहे. त्यानंतर त्यांनी रात्री ९-२१ वा.फेसबुकवर पोस्ट केली की, “नालायक माणसांना सभागृहात बोलण्याची संधी मिळाली की, ते तत्वज्ञानी म्हणून बेछूट आरोप करतात आणि यालाच लोकशाही म्हणतात”. असे दिले. यामूळे त्यांनी सदस्यांचाच नाही. तर लोकशाहीचा अपमान केला. जी लोकशाही राज्य घटनेच्या माध्यमातून डॉ.बाबासाहेबांनी लिहून दिली त्याचा अपमान सदस्यांना मान्य आहे का? जो लोकशाहीचा अपमान करतो. त्याची शिक्षा कठोर असायला पाहिजे. दुसरे दिवशी ते सांगतात की, हे मत लोकसभेबद्दल मांडले परंतु लोकसभेच्या खासदारानी हक्क भंगाची कार्यवाही केली. तर दोन वर्ष सुटणार नाही. कोणत्याही अधिकारावर हक्क भंगाची कार्यवाही झाली तर मा.कोर्टात सुध्दा त्याला चॅलेंज करू शकत नाही. लगच त्यांनी ती पोस्ट दुसरे दिवशी डिलीट का केली? पुन्हा त्यांनी आपणाकडे पत्र दिले की, मा.नरेंद्र मोदी भाषण करीत असतांना खासदार श्रीमती चौधरी हसल्या. म्हणून मत व्यक्त केले तर त्यानी कोणत्या पक्षाचे मत मांडले. शासकीय कर्मचारी यांना १९६८ च्या कलम ६,७ प्रमाणे अशा प्रकारचे मत व्यक्त करणेचा अधिकार नाही. हे करणे म्हणजे अपराध व गुन्हा होतो आता सर्व बाजू ऐकल्या. श्री.खरवडकर यांना तात्काळ निलंबीत करावे. त्यांनी सर्वांचा अपमान केला. विषय राज शिष्टाचाराचा आहे. त्यांनी पॅनलवर वकील नसतांना महापालिकेची फसवणूक केली. म्हणून त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करावी.

श्री.विकास जैन :जी पोस्ट टाकली त्यात त्यांनी सदस्यांना नालायक म्हटले. असे असेल तर नागरीकांनी या सदस्यांना निवडून कसे दिले. मा.आयुक्त सुध्दा एक सदस्य

असतात सर्व विचार करून मत लक्षात घेता, त्याचेवर निलंबनाची कार्यवाही करावी.

श्रीमती सुनिता आऊलवार:सदस्यांना जनतेने निवडून दिले. सदस्यांचा मान सन्मान केला पाहिजे. जनतेसाठी सदस्य काम करतात. महापौर हे सुध्दा एक सदस्य असतात. चांगली वागणूक दिली पाहिजे. सदस्यांनी जे मत व्यक्त केले त्यानुसार कार्यवाही करावी.

श्री.भगवान घडमोडे :जी पोस्ट अधिकारी यांनी टाकली, ती लोकशाहीचा अवमान करणारी आहे. सदस्यांनी मत व्यक्त केले. चर्चा होत असतांना काहींनी एक दुसऱ्याची बाजू घ्यायची हा सुध्दा अवमान आहे व अशा वेळी चर्चा होत असतांना काही अधिकारी यांना आनंद होत होता. दुफळी झाली, म्हणजे प्रशासनाचे अधिकारी याचे भले होते का? अधिकारी चुक करीत असेल तर ठोस निर्णय घेतला पाहिजे. सत्य असत्य बाजू मांडली गेली पाहिजे. लोकसभेची पोस्ट टाकली असे नंतर सांगतात, सभागृहा विषयी ज्या भावना असतील, त्या सरकारी नोकरास जाहीर करता येत नाही. त्यांना त्यांचे भावना मा.आयुक्त मा.महापौर यांचेकडे मांडू शकत होते. सभागृहाची भावना लक्षात घेता त्यांना निलंबीत करण्यात यावे.

श्री.अब्दुल नाईकवाडी :संबंधीत अधिकारी यांनी जी चुक केली. त्यांचे समर्थन करणार नाही. परंतु यापुर्वी श्री.नाईकवाडे यांनी अपशब्द वापरले होते. त्यांनी माफी मागितली त्यामूळे कार्यवाही केली नाही. श्री.खरवडकर हे ही माफी मागत असेल तर त्यांना माफ करावे.

मा.उपमहापौर :अधिकारी यांचे बाबतीत चर्चा केल्यामुळे त्यांनी सभागृहाच्या बाबतीत जी पोस्ट टाकली. गैरवर्तणुक केली. ११५ सदस्याचा अपमान केला. आताच खुलासा घेतला की, जे पॅनलवर वकील नव्हते. तरी त्यांना महापालिकेची बाजू मांडायला लावली. त्यामूळे श्री.खरवडकर यांनी त्यांचे पदाच्या संदर्भात मा.न्यायालयाकडून निर्णय लावून घेतला. त्यामूळे मनपाची फसवणूक केली. त्याची अतिक्रमण विभागात बदली केली. असताना रूजू झाले नाही. सभागृहाच्या भावना लक्षात घेता त्यांना निलंबन करावे.

मा.महापौर :नगर रचना विभागातील अधिकारी श्री.जयंत खरवडकर यांनी फेसबुकवर जी पोस्ट टाकली. त्या पोस्टच्या माध्यमातून संपूर्ण सभागृहाचा अवमान झालेला आहे. सर्वाच्यांच भावना दुखावलेल्या आहेत. माझेकडे त्यांचे विरूध्द तक्रार घेऊन आले. या ठिकाणी मा.आयुक्त साहेबांना या संदर्भाने माझ्यासह सर्व स.पदाधिकारी स.सदस्य यांनी योग्य ती कार्यवाही करण्याची सुचना केली. असता त्यांना प्रशासनाने खुलासा करणे बाबत लेखी पत्र दिलेले होते. त्या अनुषंगाने त्यांनी त्यांचा खुलासा माझेकडे दिला आहे तो असा की,

मा.महापौर,
महानगरपालिका औरंगाबाद

विषय : फेसबुक वरिल पोस्ट बाबत खुलासा

मा.महोदय,

मागील दोन दिवसापासुन स्थानिक वृत्तपत्रात माझ्या फेसबुकवरील एका पोस्ट बाबत गैरसमज पसरविण्यात येत असुन त्या पोस्टचा संबंध महानगरपालिकेशी जोडण्यात येत आहे. या बाबत मी खालील प्रमाणे खुलासा करीत आहे दोन दिवसापूर्वी संसदीय कामाचे वृत्त इलेक्ट्रॉनिक वाहिनीवर पाहत असतांना आदरनिय पंतप्रधान यांच्या भाषणाच्या वेळी काही संसद सदस्य यांनी गोंधळ करून गैरशब्द वापरले हे पाहुन माझे मन व्यथित झाले व मी माझ्या मित्रमंडळीसाठी मर्यादीत असलेल्या फेसबुक अकांऊटवर भावना व्यक्त केली. मी फेसबुक अकांऊटवर नेहमी आंतरराष्ट्रीय,राष्ट्रीय घडामोडी कला, क्रिडा, मनोरंजन इत्यादी बाबत मित्रांना पोस्ट टाकत असतो. तसेच हि पोस्ट सुध्दा सर्वसाधारण स्वरूपाची होती. मी टाकलेली फेसबुक वरील पोस्ट ही महानगरपालिकेच्या कोणत्याही कामाकाजाशी संबधीत नव्हती. औरंगाबाद महानगरपालिकेचे सभागृह हे माझेसाठी श्रेष्ठ व आदरणीय आहे. या सभागृहातील पदाधिकारी व सन्माननीय नगरसेवक हे माझ्यासाठी आदरणीय आहेत तथापि कोणीतरी माझ्या वैयक्तिक बाबतीत सोशल मिडीयावरील पोस्टचा महानगरपालिकेशी संबंध जोडुन गैरसमज पसरवु पाहत आहे.

करिता, वरील प्रमाणे मी आपणाकडे सविनय खुलासा सादर करत आहे.

श्री.खरवडकर यांनी फेसबुकच्या पोस्ट संदर्भाने केलेला खुलासा अमान्य करून हे सभागृह निर्णय देत आहे की, दिनांक १२-२-२०१८ रोजी श्री.जयंत खरवडकर मनपाचे अधिकारी यांनी त्यांचे फेसबुकवर सर्वोच्च सभागृहातील सदस्यांचा अपमान होईल अशा प्रकारची पोस्ट टाकल्याचे सभागृहाचे मत आहे. आताच सभागृहात ११ सदस्यांनी आपले मत मांडले. पैकी दोन सदस्यांनी त्यांचे बाजूने मत मांडले आहे. तर बहुसंख्येने म्हणजे ९ सदस्यांनी जी फेसबुकवर पोस्ट टाकली. त्यांच्या विरोधात आपले मत मांडून त्यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करण्याची मागणी सभागृहात केली आहे. श्री.खरवडकर हे महानगरपालिकेचे अधिकारी आहेत. महापालिका हे सर्वोच्च सभागृह आहे. त्यांनी फेसबुकवर भावना दुखवणारी पोस्ट टाकल्यानंतर सदस्यांनी मा.आयुक्तांची भेट घेतली व त्यांचेवर कार्यवाहीची विनंती केली आहे. त्यानुसार मा.आयुक्त यांनी दिनांक १२-२-२०१८ रोजी श्री.जयंत खरवडकर यांना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ चे कलम ३ चा भंग केल्यामुळे त्यातील तरतुदीनुसार कठोर शिस्तभंगाची कार्यवाही का करण्यात येऊ नये? अशी कारणे दाखवा नोटीस बजावली. त्याचा खुलासा प्राप्त असून अद्याप महापालिका प्रशासनाकडून निर्णय झाला नाही/कार्यवाही झाली नाही.

आज या विषयावर सभागृहात सन्माननिय सदस्यांनी अत्यंत तिव्र भावना व्यक्त केल्या त्याची नोंद सुध्दा झाली आहे. श्री.खरवडकर यांनी मी भारतीय संसदेच्या संदर्भात पोस्ट टाकली असे म्हटले आहे. ते सुध्दा विसंगत वाटत आहे. त्यावर देखील सदस्यांनी आक्षेप घेतला आहे. त्यामूळे श्री.खरवडकर यांची

ही वर्तणूक निश्चितच शासकीय अधिकाऱ्यांनी शिस्तभंग केल्याचे दिसून येते असे सभागृहाचे मत आहे. व तसे सिध्द सुध्दा झाले आहे. सभागृहाच्या तिव्र भावना लक्षात घेता श्री.जयंत खरवडकर यांचेविरूध्द कठोर शिस्तभंगाची कार्यवाही करणे अपरिहार्य झाले आहे. हे सभागृह सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन श्री.जयंत खरवडकर यांना निलंबीत करण्याचे आदेश मा.आयुक्तांना देत आहे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्री.भगवान घडमोडे :८-१० दिवसापासून एन-२, सिडको, विठ्ठलनगर, मुकूंदवाडी, रामनगर चिकलठाणा, ठाकरेनगर या भागात ५ ते ६ दिवसाआड पाणी येते आले तरी रात्री ११ वा. १ वा.पाणी येते. फोन केला तर उत्तर बरोबर देत नाही. पाणी येण्याची वेळ निश्चित नाही. अधिकारी दखल घेत नाही. सर्व नियोजन कोलमंडले आहे. माहिती घ्यावी.

श्रीमती किर्ती शिंदे :आजच्या डीबी स्टार मध्ये आले की, महिलांचा सुरक्षेचा प्रश्न व होणारी कुचंबना असे आले. महिला शौचालयाच्या बाजूलाच अतिक्रमण झाले. महिलांना शाचौलयास जाता येत नाही. कुचंबना होते. १०० मीटर अंतरापर्यत अतिक्रमण नसावे. परंतु नियमाची पायमल्ली होते आहे. अतिक्रमण झाले. पाच शौचालयाचे उद्घाटन केले काम का होत नाही? ८ मार्च पर्यत काम पुर्ण व्हावे. तेथील सर्व अतिक्रमण काढावे.

मा.महापौर :कॅनॉट प्लेस भागात तशी परीस्थिती निर्माण झाली आहे. सर्व शौचालयाचे काम ८ मार्च पर्यत करावे.

श्रीमती सत्यभामा शिंदे :स्त्रीच्या सुरक्षीतेचा प्रश्न निर्माण झाला. महिला शौचालयाच्या बाजूला असलेले अतिक्रमण काढावे.

श्रीमती स्वाती नागरे :टी.व्ही.सेन्टर येथील सुलभ शौचालय बंद आहे. तेथील अतिक्रमण हटवावे.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:महिला शौचालयाच्या बाजूला अतिक्रमण झाल्याने तेथे गुंड प्रवृत्तीचे लोक उभे असतात. त्यामूळे कॅनॉट प्लेस भागात एका महिलेला त्या शौचालयास जाता आले नाही. बोलण्यास गेले असता, मारहाणीवर प्रकरण आले. ते अतिक्रमण करणारे नागरीकांना सांगतात की, आम्ही मनपाच्या अधिकाऱ्यांना पैसे देतो. म्हणून आमचे अतिक्रमण कुणी हटवू शकत नाही. असे कोण अधिकारी आहेत? त्यांचेवर कार्यवाही करावी. त्या महिलेने अधिकारी यांना देणेसाठी बागंड्या पाठविल्या आहे. तेथील आजच अतिक्रमण काढण्यात यावे.

श्रीमती माधुरी देशमुख :प्रत्येक वेळी शौचालयाच्या बाबतीत बोलावे लागते. मनपाचे शौचालयात सुध्दा स्वच्छता नाही. पाणी नाही. बेसींगमधील पाणी सोडावे लागते. भुमिगत गटार योजनेतून काही निधी महिला शौचालयासाठी वळती करावा. झालेले अतिक्रमण त्वरीत काढावे.

मा.आयुक्त :एका तासात तेथील अतिक्रमण हटविले जातील.

श्रीमती सिमा खरात :५ महिला शौचालय बांधण्याचे उद्घाटन केले. पाच सदस्यांची समिती नेमली होती काम होत नव्हते. तर तसे सांगायला पाहिजे होते. आता जागा नाही. इतर अडचणी आहेत सांगतात. हे योग्य नाही.

श्रीमती स्मिता घोगरे :शौचालय बांधण्यास जागेची अडचण येणार हे उद्‌घाटन करतांना सांगितले नाही. त्या ठेकेदाराचे बील दिले जात नाही. त्याचे साहित्य चोरीला जाते. पोलीस करावी लागते. त्यासाठी संबंधीत ठेकेदारास प्रशासनाने मदत करावी.

श्रीमती माधुरी देशमख :महिला शौचालयात दारूडे लोक सुध्दा जातात. २०० प्रकरणात गुन्हे दाखल झाले. अशा लोकांवर कार्यवाही करावी.

श्रीमती ज्योती नाडे :शौचालयाच्या बाजूला असलेले अतिक्रमण त्वरीत काढावे. दारू सिगारेट पिणारे लोक तेथे असतात. कार्यवाही करावी.

श्रीमती चक्रनाराण सिमा:नवीन शौचालय होत नाही. जुने आहे त्याचे बाजूला अतिक्रमण केले.

श्रीमती पुष्पा रोजतकर :हर्सुल टी-पॉईन्ट भागात शौचालयाच्या बाजूला अतिक्रमण झाले. कार्यवाही करावी तेथे सुरक्षा रक्षक द्यावे.

श्रीमती अर्चना निळकंठ :या शौचालयाच्या ठिकाणी असलेले अतिक्रमण काढण्यात यावे. महिलांना सुरक्षा व सुविधेचा लाभ घेता येईल.

श्रीमती माधुरी देशमुख :मा.कोर्टाच्या निर्देशानुसार कार्यवाही केली का? मा.कोर्टात दाखल केलेले प्रकरण व त्या संबंधीत झालेले आदेशाची प्रत देण्यात यावी.

श्रीमती किर्ती शिंदे :शौचालयाच्या ठिकाणी पाणी व इतर व्यवस्था व्हावी.

श्रीमती समीना शेख :मनपा मुख्य इमारतीत शौचालय व्यवस्थीत नाही. महिला टॉयलेटच्या ठिकाणी गुंड प्रवृत्तीचे लोक जाणार नाही यासाठी CCTV कॅमेरे मनपाच्या निधीतून लावावे. मा.कोर्टाने महिला टॉयलेट १ वर्षात करण्याचे आदेशीत केले होते. दोन वर्ष होत आहे कामे का केली नाहीत?

कु.सायली जमादार :अतिक्रमण काढावे व तेथे अतिक्रमण होणार नाही याची नियमित दखल घ्यावी.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :८ मार्च २०१७ ला जागतिक महिला दिनी पाच ठिकाणी महिला शौचालय बांधणेचे उद्‌घाटन केले. एस.बी.कॉलेज जवळील जागेचा प्रॉब्लेम सॉल्व्ह केला. पैठणगेट येथे तीन वेळेस बांधकाम सुरू करण्याचा प्रयत्न केला. तेथे पोलीस विभागाचे कार्यालय आहे. त्यांचे म्हणणे की, रस्त्यात येते मागे शौचालय बांधावे. त्यानंतर मा. आयुक्त महोदय यांची सुचना आहे की, समोर टॉयलेट करावे. ते काम दुसरे एजन्सीकडून सुरू होईल. मकबरा येथील काम सुरू केले, टाऊन हॉल येथे खोदाई झाली. औरंगपूरा येथील काम सुरू होत आहे. बॉटनिकल गार्डन येथील काम होईल. दिनांक ८ मार्च २०१८ पर्यत काम होईल.

मा.महापौर :मा.उच्च न्यायालयाचे आदेश व शासनाचे धोरण विचारात घेता, तातडीने कामे व्हावे. काम करण्यास तांत्रिक अडचणी काय? लेखी माहिती माझेकडे द्यावी. शौचालय समितीचे सदस्या व इतर महिला सदस्या सोबत स्थळ पाहणी करावी. योग्य मार्ग काढावा

श्री.त्र्यंबक तुपे :शहरात इतरही आवश्यक ठिकाणी जेथे जास्त वर्दळ आहे. तेथे शौचालय करावे. महापालिकेच्या अनेक जागा आहे. पैठणगेटचे संकुल मनपाचे आहे. पाठीमागे शौचालय न होता समोर व्हावे. मुख्य रत्यावर ही शौचालय असावे. शासनाच्या निधीचा विचार न करता मनपाने तरतूद करावी. गुलमंडी येथील मुतारीच्या ठिकाणी नवीन शौचालय करावे.

श्रीमती किर्ती शिंदे :शहरातील जे शौचालय आहे. त्यांचे मेन्टेनन्स साठी स्मार्ट सिटीच्या निधीतून नियोजन करावे.

श्री.रामेश्वर भादवे :पैठणगेट भागात मनपाची जागा आहे. त्या जागेवर वाद नाही. तेथे शौचालय करावे.

मा.महापौर :उद्या संबंधीत अधिकारी यांनी जागेची पाहणी करावी. तसेच शहरात महिलांसाठी इतर ठिकाणी शौचालय असण्याची गरज आहे. कंपनीचे मालक श्री.तरंग जैन यांनी सीएसआर फंड देण्याचे कबूल केले. विनंती करावी. निधी घ्यावा. इतरही लोक सीएसआरच्या माध्यमातून निधी देण्यास तयार आहे. तोही घ्यावा जेथे योग्य वाटत असेल तेथे शौचालय करावे. कमेटीच्या सदस्यांसोबत पाहणी करावी अहवाल द्यावा.

श्रीमती सत्यभामा शिंदे :एन-२ भागात कामगार चौकात शौचालय करावे.

श्रीमती मुल्ला सलीमा बेगम:जुने शौचालयाच्या जागेवर नवीन शौचालय करण्याबाबत काय कार्यवाही केली?

श्री.विकास जैन :कबीरनगर भागातील शौचालयाचे काम का सूरू केले नाही?

कार्य.अभियंता-ड्रेनेज :चार ठिकाणी लायन्स क्लब ऑफ सेन्टर यांचे मार्फत सीएसआरच्या माध्यमातून शौचालय करणार होते. त्यांचे जे पदाधिकारी आहेत. त्यांना वेळोवेळी विचारणा केली.

श्री.त्र्यंबक तुपे :मनपाच्या फंडातून काम करावे.

मा.महापौर :सीएसआरच्या माध्यमातून काम होत नसेल तर मनपा फंडातून मा.आयुक्तांची मंजूरी घेऊन काम सुरू करावे. गुलमंडी येथील मुतारीच्या जागेवर शौचालय करावे.

श्री.विकास जैन :कबीरनगरचे शौचालय मनपा फंडातून करावे.

श्री.भगवान घडमोडे :मुकूंदवाडी भाजी मंडई मध्ये शौचालयाचे उद्घाटन झाले काम केले नाही.

श्री.राहूल सोनवणे :कबीरनगर शौचालयाचे काम आठ दिवसात सुरू करावे. वैयक्तिक शौचालयाचे ६ हजार लाभार्थीला मिळाले. उर्वरीत अनुदान मिळाले नाही.

मा.महापौर :सदस्यांनी सुचना केल्यानुसार पाहणी करावी. त्याचा अहवाल माझेकडे द्यावा.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :शासनाकडून फंड मिळणेसाठी कार्यवाही चालू आहे.

श्रीमती मनिषा मुंढे :माझे वार्डात नाला खोदून ठेवला. लोकांच्या घरात घाण पाणी जाते. तातडीने बांधकाम चालू करावे.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :त्या कामाबाबत स्थायी समिती समोर ठेवले आहे. मंजूरी झाल्यानंतर आठ दिवसात काम सुरू होईल.

श्री.सिध्दांत सिरसाट :सातारा देवळाई येथील नागरीकांचे विकास कामासाठी मोर्चा आणलेला आहे त्यांचे निवेदन स्विकारावे.

श्री.विकास जैन :तेथे कोणतेही विकास कामे होत नाहीत. त्यांचा मोर्चा आलेला आहे. सभा काही वेळासाठी तहकूब करावी. त्यांचे निवेदन स्विकारावे.

श्रीमती सिमा चक्रनारायण:काबरानगर नाल्यावरील अतिक्रमण काढूनही भुमिगत गटार योजनेचे काम सुरू होत नाही.

कु.सायली जमादार :सातारा देवळाई भागात लाईट शिवाय इतर कोणतेही काम होत नाही. इतर मुलभूत सुविधा मिळाव्या. त्यासाठी मोर्चा आलेला आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :या भागात कोणतेही कामे होत नाहीत. सध्या कोणती कामे त्या भागात होत आहे?

मा.महापौर :एलईडी लाईट फिटींग शहरात लावत आहे. जुन्या फिंटीग सातारा देवळाई भागात बसवाव्यात अशा सुचना केल्या होत्या. तसेच आता या भागात कोणती कामे होत आहेत? करणार आहेत?

कार्य.अभि.श्री.कोल्हे :वार्ड-११४ मध्ये ३० कामे सादर केलेली आहे. ६ कामे पुर्ण झाली असून एक काम प्रगती पथावर आहे. उर्वरीत कामे एजन्सी व इतर मान्यतेस्तव आहेत. ९.६६ कोटी मंजूर झाले आहे. वॉर्ड क्र.११५ मध्ये २४ कामे, दोन कामे पुर्ण दोन कामे प्रगतीवर व बाकी मंजूरीस्तव आहे. एकूण ४.३४ कोटीची कामे आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :याच भागात जेथे वसाहत नाही, घरे नाही अशा ठिकाणी कामे होत आहे. जेथे घर आहे लोक कर भरतात. अशा भागात कामे करावी.

मा.महापौर :फिजीकल सर्वेक्षण रस्त्याचे करावे जे आवश्यक आहे तेथील कामे करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :१० टक्के कामे या भागात झाली. सातारा देवळाई कामाच्या ज्या ज्या संचिका असतील त्या संबंधीत सर्व विभागाचे अधिकारी यांना महापौर दालनात बोलवून त्या निकाली काढाव्यात.

मा.महापौर :डिफरची कामे व यापूढे अंदाजपत्रक करतांना दोन्ही वार्डात समान कामे कशी होतील. त्यासाठी प्रयत्न करावे. शहर अभियंता यांनी सर्व अधिकारी यांची बैठक घेऊन कार्यवाही करावी.

कु.सायली जमादार :सन २०१६-१७ च्या बजेट मधील कामे झाली नाही.

श्री.विकास जैन :रस्त्याची कामे होत असतांना तेथे ड्रेनेज व पाण्याची लाईन, केबल असेल ही पण कामे सोबतच करण्याचे नियोजन असावे.

कार्य.अभियंता-विद्युत :सातारा-देवळाई भागात जुने लाईट फिटींग लावणेसाठी ब्रॅकेट व इतर साहित्यसाठी अंदाजपत्रक मंजूरीसाठी आहे.

कु.सायली जमादार :स्ट्रीट लाईटसाठी जी पाचवी वायर लागते. त्याची संचिका मंजूर होत नाही.

मा.महापौर :तात्काळ ब्रॅकेट खरेदी करणे बाबत मा.आयुक्तानी निर्णय घ्यावा.

श्री.नासेर सिद्दीकी :जुने लाईट फिटींग निघेल ते पडेगाव, सईदा कॉलनी, कासंबरी भागात जुने लाईट फिटींग लावावे.

मा.महापौर :जुनी लाईट फिटींग याही भागात लावण्यात यावेत.

श्रीमती स्मिता घोगरे :बीडबायपास रस्त्यावरील स्ट्रीट लाईट नियमित बंद असतात. समृध्दीपार्क भागातील लाईट बंद आहे. स्मशानभुमीमध्ये लाईट लावले. परंतु चालू केले नाही.

श्रीमती मुल्ला सलीमा बेगम:हमालवाडा बीडबायपास रस्त्यावरील लाईट नियमित बंद असतात.

कार्य.अभियंता-पापू :सातारा-देवळाई भागासाठी स्वतंत्र डीपीआर साठी टेंडर मागविले. ९ एजन्सीने प्रस्ताव दाखल केले. कन्स्ल्टंन्टची नियुक्ती करून कार्यवाही होईल.

मा.महापौर :अर्धा तासासाठी सभा तहकूब करण्यात येते.

(वेळ दु.२-१० वा. पुन्हा ३-०० वा.सभेला सुरूवात).

या वेळी स.सदस्य श्री.राजू शिंदे यांना त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने सभागृहाच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या व त्यांचा मा.महापौर यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

मा.महापौर :स.सदस्य श्री.घडमोडे यांचे प्रश्नाचा खुलासा करावा.

कार्य.अभियंता-पापू :रामनगर भागात १,४,९,११,१४ तारखेला पाणी दिले होते. विठ्ठलनगर भागात ३१, नंतर ३,६ तारखेला पाणी देण्यात आले होते. ७ तारखेला कमी पाणी दिले. ८ तारखेला विज पुरवठा बंद केला होता. पुन्हा १० व १३ तारखेला पाणी दिले. पाणीपुरवठा विस्कळीत झाला होता. पुर्वपदावर आणण्यात येत आहे.

श्री.भगवान घडमोडे :१५ दिवसात असे होते की, एन-५ टाकीवरून येणारे पाणी १०-१५ वार्डात येत नाही. पाणी येण्याची वेळ निश्चित नाही. सर्व कामगार लोक राहतात. केंव्हा पाणी देणार सांगत नाही.

कार्य.अभियंता-पापू :पुंडलिकनगर टाकीपासून एन-४ पर्यत ५०० मी.मी.व्यासाची लाईन टाकणार आहोत. या भागासाठी त्याचा फायदा होईल. विद्युत पुरवठा बंद झाला होता. म्हणून पाणीपुरवठ्यात व्यत्यय आला.

श्रीमती मिना गायके :पुंडलिकनगर भागालाच पाणी मिळत नसतांना इतर ठिकाणी पाणी का नेत आहे? घाण पाण्याचा प्रश्न आहे तो सोडवित नाही.

कार्य.अभियंता-पापू :पंपचे वॉल्व्ह साफ केले. पाणीपुरवठ्यात वाढ झाली आहे.

श्री.भगवान घडमोडे :पाणी येणे विस्कळीत होते. त्यांचे कारण सांगितले जात नाही. पुढील नियोजन आताच करावे. आता उन्हाळ्याचे दिवस सुरू झाले आहे.

श्रीमती ज्योती नाडे :माझे वार्डात रात्री १, २ वाजता पाणी येते ५-६ व्या दिवशी पाणी सोडतात. पाणी आल्यानंतर पुन्हा वॉल्व्ह बंद केले जात नाही. पाणी वाया जाते. तसेच काही वेळा घाण पाणी येते.

श्री.कमलाकर जगताप :सिडको एन-२ भागात पाणी येत नाही. अधिकारी फोन उचलत नाही. कार्यवाही होत नाही.

श्रीमती शोभा बुरांडे :प्रतापनगर भागात पाणी कमी दाबाने येते.

श्रीमती सिमा खरात :चार दिवसात पाणीपुरवठा सुरळीत होईल असे म्हटले दोन महिने झाले कार्यवाही होत नाही. अनेक वेळा गॅप दिला जातो. पाणी वाटपास गॅप असल्याचे एक तास अगोदर कळविले जाते.

श्रीमती स्वाती नागरे :कमी दाबाने वार्डात पाणी येते.

श्रीमती सिमा चक्रनारायण:दिनांक १८.१२.१८ रोजीच्या सभेत विषय क्र.१३० मंजूर केला. ते काम अद्याप सुरू केले नाही. निविदा झाली चेंज ऑफ साईडचा विषय आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :चेंज ऑफ साईडचे काम असेल तर सभेच्या मंजूरीची गरज नाही. कार्यकारी अभियंता यांचे लेवलवर ते काम व्हावे. तशी परवानगी द्यावी.

मा.महापौर :धोरण निश्चित करावे. मा.आयुक्ताची मंजूरी घेऊन कार्यवाही करावी.

श्रीमती सिमा चक्रनारायण:वार्डातील नाल्याचे अतिक्रमण काढले. भुमिगत योजनेचे काम सुरू केले नाही.

कार्य.अभियंता-पापू :स.श्रीमती गायके यांचे वार्डात पाणीपुरवठा लाईन टाकलेली होती. त्यावर ड्रेनेज लाईन टाकली. ती साईडला टाकायला पाहिजे होती.

मा.महापौर :श्री.डी.पी.कुलकर्णी यांनी उद्याच स्थळ पाहणी करावी. एक लाईन डेड करावी. दुसऱ्या साईडला टाकावी. दोन्ही विभागाचा समन्वय असायला पाहिजे.

श्री.आत्माराम पवार :माझे वार्डात पाणी सोडणारे श्री.कापसे लाईनमन दारू पिलेला असतो. रु.१०-२० ज्यांनी दिले. त्या भागात पाणी सोडतो. इतर ठिकाणी पाणी मिळत नाही. त्याची बदली करावी.

श्री.सिताराम सुरे :एन-५ टाकीवर मुबलक पाणी असावे. जेणे करून आमच्या वार्डात पाणी मिळेल.

मा.महापौर :या टाकीसाठी एक्स्प्रेस लाईन आहे. त्या लाईनला आता पंक्चर करू नये टाकीमध्ये मुबलक पाणी येईल. याचे नियोजन करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :प्रत्येक वार्डात पाणी पाहिजे. पाणी जास्तीचे नाही म्हणून पाणीपुरवठ्याची लाईन टाकण्याचे कामे थांबविता येणार नाही. अनेक जुन्या लाईन झाल्या. पाणी वाटप करतांना अडचणी येतात व आठवड्यातून एकदा तरी गॅप पाणी देणेमध्ये येतो. दररोज पाणी देता येईल. असे नियोजन करावे. समांतरच्या पिरीएड मध्ये अत्यावश्यक चेजेंस केले होते. १-२ कोटी खर्च केले. प्रति व्यक्ती १३५ लिटर पाणी देऊ असे सांगीतले गेले. परंतु तसे आजपर्यंत झाले नाही. ५०० लाईन एन-३, ४ साठी टाकणार आहे. त्यामूळे मागिल भागातील पुरवठा विस्कळीत होणार काय? याचे नियोजन होत नाही. जायकवाडी पासून फारोळा पर्यंत पाणी आणण्यासाठी ज्या गोष्टी आवश्यक आहे त्या कराव्यात. २५-३० वर्षाचे नियोजन केलेले आहे. त्याप्रमाणे कामे व्हावी. अनेक भागात जलवाहिन्या टाकल्या जाव्यात. समांतर एजन्सीने जे जे डिझाईन केले. त्यानुसार कामे करून येत्या उन्हाळ्यात पाणी टंचाई येणार नाही.

श्री भाऊसाहेब जगताप :आमच्या भागात ७, ८ दिवस पाणी येते. रात्री बेरात्री पाणी येते. पाणी सोडल्यानंतर टाकीची लेव्हल कमी होते. पुन्हा पाणी बंद होते. असा प्रकार नियमित होतो. ठोस निर्णय घ्यावा.

श्री.शेख जफर :माझे वार्डात नळाला ड्रेनेजचे पाणी येते. संबंधीत अधिकारी यांना कल्पना दिली, काम केले जाईल. असे सांगतात. केंव्हा काम होणार आहे. नागरीक तक्रार घेऊन घरी येतात.

श्री.कैलास गायकवाड :इंदिरानगर बायजीपूरा भागात पाणीपुरवठा लाईनच्या वर ड्रेनेज लाईन असल्याने दोन गल्ल्यामध्ये नळाला घाण पाणी येते. पाणीपुरवठ्याची लाईन बदलावी. ड्रेनेजची मेन सिवेज लाईन आहे ती पण जूनी झाली आहे.

श्री.बन्सी जाधव :भगतसिंगनगर भागात लाईट व पाणी नाही. नागरीक आमच्या घरी येऊन मागणी करतात.

श्री.अब्दुल ताहेर शेख :एन-४ भागात एन-५ च्या टाकीवरून पाणी दिले. जाते प्रेशर कमी आहे. एकूण ६ टप्पे आहेत दुरच्या टप्प्याला अगोदर पाणी द्यावे. जवळच्या नंतर पाणी दिले तर सर्वांना पाणी मिळेल.

श्री.अय्युब जहागीरदार :आमच्या वार्डात महिन्यातून ६ वेळेस असे एक वर्षात ७२ वेळेस पाणी मिळते. परंतु ४०५० कर भरावा लागतो. त्या हिशोबाने एका दिवसाचे ११.२५ रूपये होतात. या प्रमाणे ७२ दिवसाचे ८१० रूपयेच होतात. तर किती रक्कम भरणा करायला पाहिजे. १५०-१५५ एमएलडी पाणी येते. त्यापैकी ३०-३५ एमएलडी पाणी चोरी जाते. पाईपचे तुटफूट होते. देखभाल दुरूस्तीमध्ये मोठा खर्च होतो.

पुणे मध्ये दोन वेळेस पाणी दिले जाते. १२००/- रू पाणीपट्टी आहे. नाशिक मध्ये १६००/-आहे. दररोज पाणी दिले जाते. मुंबई १८००/- आहे. दररोज पाणि दिले जाते. ठाणे १७००/-रू.मालेगाव मध्ये ९००/- पाणीपट्टी आहे. या महापालिकेतच का एवढी पाणीपट्टी वाढीव आहे?

श्री.विकास जैन :ग्रॅव्हेटीने पाणी येते म्हणून कमी पाणीपट्टी आहे. या शहरासाठी पाणी लिप्टींग करून आणावे लागते. खर्च जास्त लागतो.

मा.महापौर :आताच सुचना केल्याप्रमाणे पाणीपट्टीची तफावत व १५५ एमएलडी येणारे पाण्याचे ऑडीट बाबत चौकशी आठ दिवसात शहर अभियंता यांनी करावी. तसेच येणारे दुषीत पाणी, पाण्याची वेळा निश्चित असाव्या. एन-५ टाकीवरून देण्यात येणारे पाणी विस्कळीत होऊ नये. पाणीपुरवठ्याची कोणतीही कामे थांबवू नये.

श्री.मनोज बल्लाळ :जुना मोढा भागात न.भु.क्र.८९१५ जागेवर अतिक्रमण झाले होते. ते काढण्यात आले. पुन्हा अतिक्रमण झाले, तेथे मा.कोर्टाचा स्थगिती आदेश आणला तो होता न.भु मा.क्र.८९१३ वर मनपाचे कर्मचारी तेथे गेले असता, परत केले व अधिकाऱ्यावर कन्टेम्ट दाखल झाला. स्टे-व्हॅकेट का करू शकलो नाही? १९८५ ला जागेचा मोबदला दिल्यानंतर जागा ताब्यात घेतली नाही

मा.महापौर :संबंधीत विभागाकडून सर्व कागदपत्र श्री.काझी यांनी घ्यावी व सर्व माहिती घेऊन कार्यवाही करावी.

**<u>विषय क्र.३७९ :-</u>**

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील सर्व प्रभागातील कचरा नारेगाव येथील डंपिग ग्राऊंड वर जमा केला जातो. सद्यस्थितीत जवळपास ३७०-४०० मे.टन कचरा नारेगाव येथे टाकला जातो. नारेगाव व आजुबाजूच्या गावातील नागरिकांनी नारेगाव कचरा डेपोवर कचरा टाकु नये म्हणून यापुर्वी अनेक वेळा आंदोलन केली आहेत. सन २०१७ च्या ऑक्टोंबर महिन्यात कचरा प्रश्नावर तेथील नागरिकांनी उग्र आंदोलन करुन शहरातील कोणत्याही स्वरुपाचा कचरा त्या ठिकाणी टाकण्यास मनाई केली. त्याचा परिणाम म्हणून शहरातील सर्व प्रभागामध्ये दोन ते तीन दिवस प्रचंड प्रमाणात कचरा साचून राहिला. सदर प्रकरणी कायमस्वरुपी तोडगा काढणे आवश्यक आहे.

त्या अनूषंगाने चीनच्या बॉस्को कंपनीने थर्मल ट्रिटमेंट द्वारे कच-याची विल्हेवाट लावण्याचा प्रस्ताव सादर केला तो शासनास मंजुरीसाठी दिनांक २१/०१/२०१८ रोजी पाठविण्यात आला आहे. तसेच शासनाने दिनांक २४/०१/२०१८ रोजी इन्दौर येथील इको-प्रो कंपनीस प्रकल्प सल्लागार म्हणून औरंगाबाद शहरासाठी नेमणुक केली आहे. त्यानूसार इको-प्रो, इन्दौर यांना दिनांक ३०/०१/२०१८ रोजी डि.पी.आर. तयार करण्यासाठी कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्या अनूषंगाने औरंगाबाद महानगरपालिकेने सदर प्रकरणात दैनिक वर्तमान पत्रात जाहिर प्रगटन देऊन Expression of Interest अभिव्यक्ती सुचनेद्वारे जाहिरात प्रसिध्द केली. ज्यामध्ये खाजगी अभिकर्ता यांनी त्यांचे मालकीचे जमिनीवर सर्व कच-याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावायची आहे. त्यासाठी आवश्यकत्या सर्व एन.ओ.सी. त्यांनी प्राप्त करावयाच्या आहेत व त्यासाठी त्यांना टिपींग चार्जेसची मागणी करावयाची आहे.

प्राप्त विषयांकीत कामाकरिता दिनांक ०९/०२/२०१८ रोजी खालील प्रस्ताव उघडण्यात आले असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे. दिनांक ०९/०२/२०१८ रोजी त्यांनी त्यांच्या ऑफर्स सादर केल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्रं. | स्वारस्य एजन्सीचे नाव | कचरा जमा करावयाचे ठिकाण | दाखल केलेले दर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| ०१ | ग्रीन इंडिया, क्रांतीचौक औरंगाबाद | गट नं.३७ बाभुळगाव, क्षेत्र ६ एकर २६ गुंठे | रु. ७५०.०० प्रति टन अ अतिरिक्त कर | ३० वर्ष |
| ०२ | आर्यवंशा बिल्डकॉन, प्रा.लि. एन-३ सिडको औरंगाबाद | निपाणी गाव बीड रोड क्षेत्र ११ एकर | रु. ८७५.०० प्रति टन | ३५ वर्ष |
| ०३ | अग्रवाल वेस्ट मॅनेजमेंट सर्व्हिसेस, वाळुज | निपाणी गाव बीड रोड क्षेत्र ११ एकर | रु. ९००.०० प्रति टन | २० वर्ष |

वरिल तीन अभिकर्त्या पैकी दोघांनी आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. फक्त ग्रीन इंडिया यांनी त्यांचा नियमाप्रमाणे रितसर प्रस्ताव सादर केलेला आहे. उक्त नमुद प्रस्तावासाठी Expression of Interest मागविल्या नंतर रितसर निविदा काढणे आवश्यक आहे. तथापी त्यासाठी बराच कालावधी लागणार आहे. नारेगाव येथील व लगतच्या परिसरातील नागरिकांनी दिनांक १६/०२/२०१८ रोजी पासून नारेगाव डंपिग ग्राऊंडवर कचरा टाकण्यास प्रतिबंध केला आहे.

अशा स्थितीत आणीबाणीची परिस्थिती उद्‌भवल्याने निविदा मागवून व त्या अंतिम करेपर्यंत सदर कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी ग्रीन इंडिया, क्रांतीचौक औरंगाबाद यांना रु.७५०/- प्रति मेट्रिक टन प्रमाणे टिपींग चार्जेस प्रमाणे काम देण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

श्री.विकास जैन :उद्यापासून नारेगाव येथे जाणारा कचरा बंद होणार आहे. प्रशासनाने काय नियोजन केले आहे?

घनकचरा-व्यवस्थापक :चार महिन्यापूर्वी तेथील नागरीकांनी कचरा टाकण्यास मज्जाव केला. तेंव्हा विनंती करून मुदत घेतली होती. तेथील कचऱ्याची व दररोजचा जमा होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावणसाठी डीपीआर करणेसाठी शासनाने जी एजन्सी नेमली. त्या एजन्सीला वर्क ऑर्डर देणेस उशीर झाला. शासनाने २४ जानेवारी रोजी इंदौरच्या एजन्सीला डीपीआर तयार करण्याचे आदेश दिले. ३० जानेवारी मनपाने त्या एजन्सीला डीपीआर तयार करण्याचे अध्यादेश दिले. डीपीआर तयार होताच शासन मंजूरीसाठी पाठवून मंजूर होताच कार्यवाही होईल. दरम्यानच्या काळात तेथील जवळच्या ८ गावांचे सरपंच यांनी विनंती केली की, एक महिन्याची मुदत द्यावी. दरम्यानच्या काळात एक्सप्रेशन ऑफ इन्ट्रेस कॉल केला आहे. एजन्सीने ज्या काही ऑफर्स होत्या ओपन केल्या. त्या एजन्सीची स्वत:ची जागा असावी. त्यांनी स्वत: कचऱ्यावर प्रोसेस करावी. आवश्यक प्रमाणपत्र त्यांनी प्राप्त करावे असे दिले होते. तीन एजन्सीने टेंडर आलेले आहे. सभेपूढे प्रस्ताव दिलेला आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :त्या लोकांनी विनंती केली उद्यापासून कचरा तेथे टाकू शकत नाही. जी एजन्सी समोर आली. ताबडतोब काम द्यावे नंतर रितसर निविदा करावी कार्यवाही करावी. असे चालू राहिल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होउ शकतो. नारेगाव येथील नागरीकांना रिलिफ देणेसाठी मा.कोर्टाचा मान ठेवण्यासाठी ताबडतोब त्या एजन्सीला काम द्यावे.

मा.आयुक्त :चार महिन्यापूर्वी नारेगाव परीसरातील गावकरी लोकांनी आंदोलन करून नारेगाव कचरा डेपोवर कचरा येऊ नये व तीन महिन्यात या कचऱ्याची

विल्हेवाट मनपाने लावावी. अशी मुदत दिली होती. त्यानंतर ते ज्या गाड्या जातात. त्या ते येऊ देणार नाहीत. असे म्हटले होते. तीन महिन्यात हा प्रश्न सोडविण्याचे महापालिकेने आश्वासन दिले होते. या तीन महिन्याच्या कालावधीत कचरा डेपो बाबत कार्यवाही केली. नारेगाव येथे २० वर्षापासूनचा कचरा १५ लक्ष मॅट्रीक टन साचून आहे. त्याचे विघटन करणे, त्यावर प्रोसेसींग करणे, खत करणे यासाठी एका चीनी कंपनीने डीपीआर सादर केला, तो शासनाकडे दिला आहे. तसेच कचऱ्याची विल्हेवाट बायोमॅनींग पध्दतीने लावणेसाठी शासनाने इंदौरची एक कंपनी आहे. त्यांचेकडून डीपीआर तयार करून घेऊन त्यानंतर टेंडर काढून कार्यवाही करावी. असे आदेश दिले होते त्या एजन्सीला वर्क ऑर्डर दिली. डीपीआर तयार करणे चालू आहे. दोन्ही डीपीआर चार-पाच दिवसात तयार होतील. त्यानंतर टेंडर काढावे लागेल. शहरातील टेंडर एक की आठ वार्डात काढायचे याचा निर्णय आठ दिवसात घेऊ शकतो. दरम्यानच्या काळात जिल्हाधिकारी यांचेकडे जमिनीची मागणी केली त्या जागा मिळालेल्या नाहीत. त्यामूळे आंदोलनानंतर तेथे कचरा टाकू शकलो नाही. नक्षत्रवाडी येथे मनपाची जागा आहे. तेथे कचरा टाकण्यास विरोध झाला. ही परीस्थिती लक्षात घेता, गावकरी मंडळीनी इशारा दिला की, गाडी येऊ देणार नाही. १५ लक्ष मॅट्रीक टन कचरा विल्हेवाट लावणेसाठी मा.जिल्हाधिकारी यांचेकडून दोन पोकलिंग मशीन डिझेल टाकून देऊ या अटीवर घेतल्या. तेथे विन्ड्रोज तयार करण्याचे काम हाती घेतले. १० दिवस काम चालेल. शहरातील कचऱ्यासाठी यावर प्रोसेसींग करणेसाठी स्मार्ट सिटीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत प्रस्ताव ठेवला. रु.१० कोटीची तरतूद ठेवली आहे. डीपीआर तयार झाल्यानंतर एका ठिकाणी की आठ ठिकाणी प्रक्रिया करायचे आठ दिवसाच्या आत टेंडर अंतिम होईल. त्यानंतर त्या कचऱ्यावर महिनाभराच्या कालावधीमध्ये प्रक्रिया सुरू होऊ शकेल. ही वस्तुस्थिती गावकरी मंडळीना सांगितले होती. एक महिन्याची विनंती केली होती. तरी ते ऐकण्याचा परिस्थिती मध्ये नाही. उद्यापासून गाड्या येऊ देणार नाही अशी त्यांची भुमिका आहे. ही परिस्थिती लक्षात घेता गाड्या दुसरीकडे न्याव्या लागतील. पर्यायी जागा सफारी पार्कची आहे. परंतु ती विशिष्ट कामासाठी आहे. त्यामुळे तो पर्याय योग्य वाटत नाही. त्यामूळे एक्स्प्रेशन ऑफ इन्ट्रेस कॉल केले. कचरा वाहतूक करून घेणे व त्यावर प्रोसेसींग करणेसाठी कोणती एजन्सी तयार आहे का? त्यांचेकडे स्वतःची जमीन पाहिजे. वेगवेगळ्या एनओसी त्यांनीच घ्याव्या. कचरा प्रोसेसींग करून विल्हेवाट लावावी. यासाठी तीन एजन्सीने सकारात्मक दिकार दर्शविला आहे. यात अग्रवाल वेस्ट मॅनेजमेंट सर्व्हिसेस, आर्यवंशा एजन्सीज, ग्रीन इंडिया, क्रांतीचौक अशा एजन्सी असून त्यांचेकडे स्वतःच्या मालकीच्या जमिनी उपलब्ध आहेत. त्याचे म्हणणे की, या जमिनी कचरा टाकणेसाठी उपलब्ध करून देतो जो कचरा गोळा होईल प्रोसेसींग करणे, प्लॅन्ट उभारणेची जबाबदारी त्यांची राहिल. कचरा वाहून नेणेसाठी टीपींग चार्जेसची मागणी केली आहे. त्यात ग्रीन इंडिया यांनी ७५०, प्रतिटन आर्यवंशा बिल्डकॉन यांनी ८७५ व अग्रवाल वेस्ट यांनी

रू.९००/- प्रति टन असा दर लावलेला आहे. कमी दर ग्रीन इंडिया यांचे आहे. त्यांचेशी वाटाघाटी केलेले आहे. त्यांचेकडे गट न. ३७ बाभूळगाव येथे जागा आहे. त्यांचे म्हणणे की, मला वर्क ऑर्डर व ॲग्रीमेन्ट ३० वर्षासाठी करून द्यावे. खर्चाचा विचार करता, पर-डे रु.३ लक्ष खर्च आहे. वर्षाकाठी रु.१०.५० कोटी खर्च येतो. जो पर्यत टेंडर होत नाही. तो पर्यत आजच्या घटकेला वर्कऑर्डर देऊ शकत नाही. परंतु आता आणीबाणीची परीस्थिती निर्माण झाली आहे. त्यासाठी टेंडर होई पर्यत ग्रीन इंडिया या एजन्सीला या दराने आहे कचरा वाहतूक व डिझेल खर्च व वाहन मनपाचे राहतील. कचरा प्रोसेसींग व जमिनी एजन्सीची असेल या अटीवर रू.७५०/- पर मॅट्रीक टन पर-डे या रेटने हा कचरा त्यांचे जमिनीवर  नेऊन टाकण्याचा प्रस्ताव टेंडर फायनल होई पर्यत असा प्रस्ताव ठेवला आहे. तातडीचा प्रस्ताव आहे. म्हणून विचार करावा. योग्य निर्णय घ्यावा.

मा.महापौर :नारेगावातील नागरीकांचा उद्यापासून कचरा येणे बंद करीत आहे. यापूर्वी त्यांचेकडून मुदत मागवून घेतली होती. तीन महिन्याचा अवधी दिला होता. खऱ्या अर्थाने आता आणीबाणीची परीस्थिती निर्माण झाली. आता गाडी तेथे येऊ दिली नाही तर त्या अनुषंगाने पर्यायी व्यवस्था म्हणून प्रशासनाने ईओआय मागवून तीन एजन्सी समोर आल्या त्यातील ग्रीन इंडिया याचा सर्वात कमी दर जे ७५०रू प्रति.टन व अतिरिक्त कर जो प्रस्ताव आहे आणीबाणीची परिस्थिती पाहता प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. उद्यापासून कार्यवाही करावी.

**<u>ठराव</u>**:-

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नारेगाव व आजुबाजूच्या गावातील नागरिकांनी नारेगाव कचरा डेपोवर कचरा टाकु नये म्हणून यापुर्वी अनेक वेळा केलेली आंदोलने तसेच सन २०१७ च्या ऑक्टोंबर महिन्यात कचरा प्रश्नावर तेथील नागरिकांनी उग्र आंदोलन करुन शहरातील कोणत्याही स्वरुपाचा कचरा त्या ठिकाणी टाकण्यास मनाई केली असून त्याचा परिणाम म्हणून शहरातील सर्व प्रभागामध्ये दोन ते तीन दिवस प्रचंड प्रमाणात कचरा साचून राहिला. नारेगाव येथील व लगतच्या परिसरातील नागरिकांनी दिनांक १६/०२/२०१८ रोजी पासून नारेगाव डंपिग ग्राऊंडवर कचरा टाकण्यास प्रतिबंध केला आहे.

सदर प्रकरणी कायमस्वरुपी तोडगा काढणे आवश्यक असल्याने आणिबाणीची परिस्थिती लक्षात घेता खाजगी अभिकर्ता यांनी त्यांचे मालकीचे जमिनीवर सर्व कच-याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणेच्या कामाकरिता दिनांक ०९/०२/२०१८ रोजी तीन अभिकर्त्यांच्या ऑफर्स प्राप्त झाल्या असून तीन अभिकर्त्या पैकी दोघांनी आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. फक्त ग्रीन इंडिया यांनी त्यांचा नियमाप्रमाणे रितसर प्रस्ताव सादर केलेला आहे. उक्त नमुद प्रस्तावासाठी Expression of Interest मागविल्या नंतर रितसर निविदा काढणे आवश्यक आहे. तथापी त्यासाठी बराच कालावधी लागणार असल्याने आणीबाणीची परिस्थिती उद्‌भवल्याने निविदा मागवून व त्या अंतिम करेपर्यंत सदर कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी ग्रीन इंडिया, क्रांतीचौक, औरंगाबाद यांना रु.७५०/- प्रति मेट्रिक टन अधिक अतिरिक्त कर याप्रमाणे टिपींग चार्जेस सह सदरचे काम देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्री.विकास जैन :मागिल विषय क्रमांक १७० बाबत प्रशासनाचा खुलासा घ्यावा. प्रशासनाचे काय म्हणणे आहे?

श्री.फेरोज खान :या विषयावर स्वतंत्र बैठक घ्यावी.

श्री.राजगौरव वानखेडे :तत्कालीन आयुक्त यांनी तो प्रस्ताव दिलेला होता. आताचे जे आयुक्त आहे त्यांचे त्यावर काय म्हणणे आहे? नेमकी किती रक्कम लागणार आहे? कोणते काम करणार आहे? डीपीआर संदर्भात सर्व माहिती द्यावी.

श्री.सयद मतीन :फाजलपूरा भागात फेरोज खान व्यक्तीवर मोकाट कुत्र्याने हल्ला केला. त्यांचा मूत्यू झाला. मोकाट कुत्रे पकडून शहरा बाहेर सोडावे. नसबंदी होते की नाही? माहिती दिली जात नाही. संबंधीत व्यक्तीच्या कुटूंबीयांना आर्थीक मदत करावी. तसेच सर्व भागात समान पाणी वाटप करावे.

श्रीमती सरवत बेगम :एसटी कॉलनी भागात १३ हजार स्क्वेअर फुट इलिगल बांधकाम चालू आहे. कार्यवाही होत नाही. या रस्त्यावरील अतिक्रमण काढले. मलबा तसाच पडून आहे.

मा.महापौर :प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्री.फेरोज खान :नगर रचना विभागाने सातारा देवळाई भागात बांधकाम परवानगी व ले-आऊट संदर्भात भ्रष्टाचार केला. या संदर्भात मी शासनास पत्र दिले होते. त्यावर शासनाने १७-१०-२०१७ ला प्रशासनाला पत्र आले. त्यावर कार्यवाही केली नाही. मी आयुक्त व महापौर यांना पत्रही दिले आहे. यात देशमूख यांनी भ्रष्टाचार केला आहे.

मा.महापौर :मा.आयुक्तांनी सर्व प्रकरण तपासून अहवाल सादर करावा. आरोप करणे योग्य नाही. विषय क्र.१७० वर बोलावे.

या वेळी श्री.फेरोज खान, श्री.ढगे, श्री.जमीर कादरी हे डायस समोर खाली बसतात

मा.महापौर :सर्वानी जागेवर बसावे. ही सभागृहाची शिस्त नाही. मा.आयुक्तांना चौकशी करणेचे आदेश दिले आहे.

(मा.महापौर यांनी वेळोवेळी सुचना देऊनही डायस समोरून सदस्य जागेवर जाऊन बसत नाही.)

मा.महापौर :स.तिन्ही सदस्यांचे सभासदत्व आजच्या दिवसापूरते रद्द करण्यात येते.

श्री.राजगौरव वानखेडे :भुमिगत गटार योजनेचे काम होणेसाठी किती रक्कम लागणार आहे? सविस्तर प्रस्ताव यायला पाहिजे.

मा.महापौर :हा प्रशासनाचा विषय आहे. निर्णय घ्यावा लागणार आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :मा.आयुक्त त्यांचे मत मांडणार होते. त्यानंतर आम्ही आमचे मत मांडू.

श्री.रामेश्वर भादवे :गांधीनगर येथील नाल्यात ड्रेनेज लाईन टाकली जात नाही. तेथील अतिक्रमण काढले आहे आता लाईन का टाकली जात नाही?

श्री.राजगौरव वानखेडे :भुमिगत गटार योजना पुर्ण व्हावी. आमची भुमिका आहे. कर्ज काढले तर महापालिकेवर बोजा पडणार आहे. घाई मध्ये निर्णय न घेता. सविस्तर ठराव यावा. ५३ कोटीमध्ये काम पुर्ण होते असे वाचले. तसा प्रस्ताव यावा प्रशासनाचा खुलासा घ्यावा.

मा.महापौर :आताच मा.आयुक्ताशी चर्चा झाली. दोन दिवसाचा वेळ मा.आयुक्त साहेब मागत आहे. आता ही सभा तहकूब करीत आहोत.

श्री.त्र्यंबक तुपे :ठेकेदाराच्या वतीने महापालिकेला झालेला पत्रव्यवहार, त्याची काम करण्याची तयारी आहे की नाही? टेंडर चार वर्षापूर्वी काढले. आता जीएसटी मूळे काही

फरक पडणार आहे का व ते ठेकेदार काम करण्यास तयार आहेत का? रेल्वे रूळाखालून लाईन टाकायची होती ती टाकली की नाही? त्याचाही खुलासा व्हावा. कामाची मुदत वाढ दिली आहे का? व सभेची परवानगी घेतली का? डीएसआरचे त्या वेळचे दर व आताचे दर यातील तफावत किती येते? ही सर्व माहिती पूढील सभा होईल त्यावेळी द्यावी.

श्री.आत्माराम पवार :कर्ज घेण्यास विरोध नाही. परंतु मालमत्ता गहाण ठेवून कर्ज घेणे यास माझा विरोध आहे.

मा.महापौर :आजची सभा तहकूब करण्यात येते.

या बरोबर सभा राष्ट्रगिताने संपविण्यात आल्याचे मा.महापौर यांनी घोषीत केले.

दिलीप दत्तात्रय सुर्यवंशी
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद